# भारतीय निवडणूक आयोगाची यशस्वी वाटचाल

**प्रा. डॉ. अनिल रा. कडू** राज्यशास्त्र विभाग प्रमुख स्व. पंचफुलाबाई पावडे महिला महाविद्यालय, वरुड

---

**प्रस्तावना**

भारतीय संविधानाने प्रातिनिधिक संसदीय शासन प्रणाली स्वीकारली असून अनुच्छेद ३२४ भारतीय निवडणूक आयोग हि एक स्वायत्त संस्था म्हणून मान्यता पावलेली आहे. भारतीय लोकशाहीचे अस्तित्व आणि भवितव्याच्यादृष्टीने निवडणूक आयोगाची निर्मिती हे एक ऐतिहासिक पाउल म्हणून सिद्ध झालेले आहे. संविधानामध्ये राष्ट्रपती, केंद्रीय आणि राज्यांचे कायदेमंडळ यांचा निवडणुकीसंबंधीची प्रक्रिया ठरविण्याचा व कायदा करण्याचा अधिकार संसदेला आहे. भारतीय संविधानानुसार देण्यात आला आहे. भारतीय संविधानाच्या पंधराव्या भागात निवडणूकांसंबंधी संचालन करण्यासाठी ३२५ कलमांनुसार तरतूद करण्यात आली.

संपूर्ण भारतातील निवडणूकांसंबंधी संचालन निवडणूक आयोग करतो. संपूर्ण भारत देशाची निवडणूक प्रक्रिया केंद्रीय, प्रादेशिक, जिल्हा व मतदारसंघ स्तरावर एकाच मध्यवर्ती निवडणूक यंत्रणेच्या हाती सोपवली असून तिच्या मदतीसाठी प्रादेशिक आयुक्ताची तरतूद केली आहे. भारतीय निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्य आणि नि:पक्षपातीपणा अबाधित राहील याची काळजी भारतीय संविधानकरांनी घेतली आहे. भारताच्या संविधानाने संसदीय शासन प्रणाली स्वीकारली असून कायद्यान्वये निश्चित केलेल्या प्रादेशिक प्रणाली स्वीकारली आणून कायद्यान्वये निश्चित केलेल्या प्रादेशिक मतदारसंघातून निवडणुकीचे संचालन करून निवडणुका घेण्यात येतात. भारतीय संविधानाच्या ३२४ कलमान्द्वारे निवडणूक आयोगामध्ये एक मुख्य निवडणूक आयुक्त (Chief Electoral Commissioner) असेल आणि राष्ट्रपती वेळोवेळी ठरवील तेवढे इतर निर्वाचन आयुक्त नागरिकांमध्ये सार्वजनिक जिवन व्यवहार सहभागी होण्यासाठी व राजकीय व्यवस्थेत सहभाग घेण्यासाठी निवडणुकीच्या माध्यमातून राजकीय प्रक्रियेत सहभागी निवडणूक हेच मध्यम असते.

डॉ. आंबेडकर म्हणतात आधी जे अधिकार राज्यापालावर सोपवायचे ठरले होते. ते निवडणूक आयोगाकडे दिले हा बदल मुलगामीच म्हणावा लागेल. भारतीय निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्य आणि नि:पक्षपातीपणा अबाधित रहिल याची काळजी संविधानाकारांनी घेतली असून निवडणूक आयोग राजकीय पक्षाच्या प्रभावापासून व कार्यकारी मंडळाच्या हस्तक्षेपापासून मुक्त असेल एक स्वयात्त संस्था म्हणून तिचे स्वरूप अधोरेखित आहे.

**भारतीय निवडणूक आयोगाचे महत्व :**

भारताने संसदीय शासनपद्धती स्वीकारली असून खऱ्या अर्थाने जनतेचे सार्वभौमत्त्व प्रस्थापित होऊन संसदीय शासनपद्धती अधिक दृढ व्हावी म्हणून भारताच्या लोकशाहीमध्ये निवडणूक प्रक्रियेला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. लोक्षशीमध्ये निवडणुका ह्या अत्यंत खुल्या वातावरणात निर्भयपणे व पारदर्शक्तेने पार पाडल्या गेल्या पाहिजेत याबाबतची सर्व जबाबदारी भारतीय निवडणूक आयोगाकडे ३२४ कलमानुसार सोपविण्यात आली आहे. निवडणुकीचे संचालन नि:पक्षपणे व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात येते. १९५२ सालच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीपासून ते २०१९ पर्यंतच्या निवडणुकीचे संचालन अत्यंत समर्थपणे पार पडले आहे. होऊ घातलेल्या २०२४ च्या निवडणूकीमध्ये 'एक राष्ट्र एक निवडणूक' आयोगासमोर आव्हानच आहे.

भारत हा जगात सर्वात मोठा लोकशाही व्यवस्था असणारे राष्ट्र आहे. भारत हा देश लोककल्याणकारी राज्याचे मार्गक्रमण करीत आहे. याचाच एक भाग म्हणजे भारत हा २०२४ पर्यंत महासत्ता होण्याच्या परीश्रामापूर्णक प्रयत्न व वाटचाल करीत आहे. भारतात लोकशाही व्यवस्था अस्तित्वात असल्यामुळे प्रतिनिधींची निवड लोकशाहीपद्धतीने समजली जाते. म्हणूनच निवडणूकींची व्यवस्था पार पडणे महत्त्वाचे कार्य आहे. संविधान निर्मात्यांना सदोष निवडणूक यंत्रणा लोकशाहीच्या मुलावर घात करू शकते. याची त्यांना जाणीव होती.

भारतीय नागरिक प्रत्येक मतदान करून आपल्या पसंतीच्या व्यक्तींची निवडणे म्हणजे निवडणूक होय. राजकीय क्षेत्रात प्रातिनिधिक निवडीसाठी निवडणुकांचा उपयोग केला जातो. मतदारापुढे एकापेक्षा अधिक पर्याय निवडणुकीत असतात पण त्यातून एकच निवडायचा असतो. निवडून दिलेले प्रतिनिधी मतदारांचे व मतदारसंघाचे प्रतिनिधी करत असतात.

केंद्रीय निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य यांच्या पुढाकाराने बदल केल्याचे दिसून येते.

१. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर
२. राजकीय पक्षांची नोंदणी

३. आचारसंहिता संबंधी आदेश
४. उमेदवारांसाठी खर्चाची मर्यादा
५. उमेदवारांच्या स्थावर जंगम मालमत्ता, गुन्हेगारी पार्श्वभूमी व शैक्षणिक पात्रतेबाबत तपशील देणारे शपथ देणे.
६. निवडणूक निरीक्षक
७. मतदार जागृती अभियान
८. विडीओ कोन्फ्रान्सिंग व्दारा आढावा
९. मतदारांसाठी वेबसाईट सुविधा
१०. निवडून आलेल्या महिला सदस्यांसाठी सबलीकरण प्रकल्प
११. इ व्होटिंग
१२. मतदान केंद्रावरील सोयी सुविधा
१३. निवडणूक साहित्य
१४. प्रभागाचे परिसीमन व आरक्षण
१५. प्रशिक्षण सी. डी. साहित्य व माहीती पुस्तीका
१६. व्ही. पी. PAD
१७. नोटा non of the above

वरील सर्व निर्णय घेऊन मातदान प्रक्रिया अधिक पारदर्शक बनविण्याचा प्रयत्न केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाने राज्य निवडणूक आयोगाने घेतलेला आहे. आणि निवडणूक प्रक्रिया अधिक सुलभ बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतीय राज्यघटनेचे प्रातिनिधिक लोकशाहीचा पुरस्कार केलेला आहे. निवडणुका निर्भय, स्वच्च, पारदर्शक पद्धतीने होण्याच्या दृष्टीने कार्य केले आहे.

भारत आदर्श आचारसंहिता निवडणूक संचालन प्रक्रियेतील अनुशासानात्मक क्रीयाप्रक्रिया व परीणामकारक घटक म्हणून स्वायत्त संस्थेचा म्हणून गतिमान होत आहे. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी निवडणुकांचे संचालन आणि लोकशाही मूल्यांचे संवर्धन संवादी, सहसंबंधी आणि लोकानुवर्तीत विधायी मार्गाने गतिमान करण्यास निवडणूक आयोगाला बऱ्याच अंशी आलेले यश लोकतंत्रात्मक विधिमय संस्थेला अधिमान्य स्वरूप बहाल करण्यासाठी पूरक ठरत आहे.

लोकशाही मुल्ये जोपासण्याची महत्वाची जबाबदारी निवडणूक आयोगावर असून आचारसंहितेचे नि:पक्षपणे अंमलबजावणी करण्याचे कार्य भारतीय निवडणूक आयोगाला पार पडावे लागते. आदर्श आचारसंहितेमुळे भारतातील निवडणुका खुल्या व चांगल्या वातावरणात होऊ लागलेल्या आहेत.त्यामुळे भारतीय निवडणूक पद्धतीमधील दोषांचे काही प्रमाणात निराकरण झालेले आहे. भारतीय राजकीय पक्षांना आणि कार्यकर्त्यांना निवडणूकिंच्या काळात चांगले वळण लावण्याचे कार्य टी. एन. शोषनच्या आचासंहिताने सिद्ध केले आहे. भारतीय निवडणूक आयोगाची आचारसंहिताखऱ्या अर्थाने १९७९ पासून प्रभावशील होत गेली व निवडणुकीचे संचालन नि:पक्ष पद्धतीने व्हायला लागले. निवडणुका पर्यंतची असणारी प्रशासकीय कसरत, कौशल्य आजही निवडणूक आयोगासमोर आव्हानात्मक स्वरुपात आहेत. मतदार, उमेदवार, सर्व प्रशासकीय अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी मुख्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली नि:पक्ष निवडणुकीचे संचालन करणे व निवडणूक आयोगावर आहे. सत्तारूढ पक्ष व विरोधी पक्ष आणि मतदार यांना विश्वासात घेऊन निवडणूक आयोगाला निवडणुका घ्यावा लागतात. इ.स. २००३ मधील जम्मू-काश्मीर विधानसभेच्या निवडणुका आयोगाने सुरुळीतपणे पार पडल्या इ.स. २०१० मध्ये बिहार राज्यात विधान सभेच्या निवडणुकीचे संचालन कार्यक्षमपणे केले, गुजरातमधील विधानसभा निवडणुकीचे संचालन करून निवडणूक आयोगाचे असणारे महत्व अनन्यसाधारण आहे. निवडणुका खुल्या वातावरणात होण्यासाठी राजकीय पक्षांनी आणि नागरिकांनी निर्वाचन आयोगाला सहकार्य देणे गरजेचे असते.

**निवडणूक आयोगाचे अधिकारी व कार्य**

१. मतदार याद्या तयार करून वेळोवेळी त्या अद्यावत करणे.
२. निवडणुकांच्या तारखा वेळेपत्रक अधिसूचित करणे.
३. निवडणुकीच्या वेळी राजकीय पक्षांनी व उमेदवारांनी आचरणात आणावयाची आचारसंहिता निश्चित करणे.
४. राजकीय पक्षांच्या वादासंदर्भात न्यायालय म्हणून कार्य करणे.

५. राजकीय पक्षांना राष्ट्रीय किंवा राज्य पक्षांचा दर्जा प्रमाण प्रदान करणे.

६. संसद सदस्यांच्या अपात्रतेशी संबंधित मुद्याबाबत राष्ट्रपतींना सल्ला देणे.

७. राज्य विधान मंडळाच्या सदस्यांच्या अपात्रतेशी संबंधित मुद्दे याबाबत राष्ट्रपतींना सल्ला देणे.

८. निवडणुका पार पडण्यासाठी आवश्यक कर्मचारी वर्गाची राज्यपाल किंवा राष्ट्रपती यांचाकडे मागणी करणे.

९. राष्ट्रपती राजवटखाली असलेल्या राज्यात निवडणुका घेता येतील कि नाही याबाबत राष्ट्रपतींना सल्ला देणे.

१०. देशातील मतदार संघाचे प्रादेशिक क्षेत्र निश्चित करणे तसेच त्यांची पुनर्रचना करणे.

लोकशाहीचे जतन करणारी व संवर्धन करणारी भारतीय निवडणूक आयोग एक आशी प्रभावी संस्था आहे.

निवडणूक आयोगाचे कार्य केवळ निवडणूका घेणे , निकाल जाहीर करणे इथपर्यंतच मर्यादित नसून त्याची व्यापकता समाजजीवनाच्या सर्व अंगाना स्पर्श करणारी आहे . टी .एन . शेषन यांच्या कालखंडापासून ओळखपत्राशिवाय मतदान करता येत नाही. धार्मिक आणि जातीय आधारावर मते मागता येणार नाही . निवडणूक खर्चाचा ताळेबंद सादर केला पाहिजे .परवानगीशिवाय कटआउट, भिंतीपत्रके, भिंती रंगवणे , रात्री दहानंतर जाहीरसभा घेता येणार नाही, निवडणुका भयमुक्त वातावरण व्हाव्यात याकरिता निमलष्करी दलाचा आणि कर्मचाऱ्यांचा उपयोग कसा करावयाचा हे ठरविण्याचे अधिकार निवडणूक आयोगाला असल्याचे जाहीरपणे प्रथमत: जाणावयाला लागते. टी.एन. शेषनपासून तर विद्यमान निवडणूक आयुक्त नवीन चावला यांच्या कालखंडापर्यंत आचारसंहितांमध्ये अनेक टी.एन. शेषन यांनी अनेक दुरुस्ती केल्या. उमेदवाराला जाहीरपणे प्रलोभने देता येणार नाही. मद्य, पैसा यांच्या खुल्या वापरांवर प्रतिबंध आला. राजकीय पक्षांच्या सभांच्या मर्यादा स्पष्ट केल्या गेल्या. ध्वनी प्रदुषणाचा प्रादुर्भाव रोखण्यात आला. घरादारांवर राजकीय पक्ष्यांचे वचने, जाहीरनामे, स्लोगन रंगविण्यास प्रतिबंध करण्यात आला. राजकीय टिपटिपणीचा स्तर ओलांडण्यास कायदेशीर कार्यवाहीचा बडगा उभारला गेला. लोकशाही पद्धतीने होणाऱ्या निवडणुकींचे संचालन करताना प्रभावीपणे आचारसंहितांची अम्बाल्बाजावाणी झाल्याने मतदार सुखावला आणि लोकशाहीच्यादृष्टीने आश्वासक वातावरण होत असल्याने त्याचा विश्वास उंचावला.

भारताचे चोविसावे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून श्री. सुशील चंद्र यांनी पदभार स्वीकारला व मावळते मुख्य निवडणूक आयुक्त सुनील अरोरा यांचा कार्यकाल पूर्ण झाल्याने ते १२ एप्रिल २०२१ ला पदमुक्त झाले होते. अरोरा यांच्या कार्कालात आयोगाने सुरु केलेल्या विविध विशेष उपक्रमांचा त्यांनी राबविलेले नागरिकांना दिव्यांग मादारांन टपालाने मत पाठविण्याचा अधिकार त्यांनी प्रदान केला.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर सुरु केल्यापासून इलेक्ट्रॉनिक मतदान याद्यांमध्ये अनधिकृतपणे फेरबदल केले जाण्याच्या तथाकथीत शक्यतेबाबत यापूर्वी चिंता व्यक्त केल्या गेल्या होत्या. मा. उच्च न्यायालये व मा. सर्वोच्च्य न्यायालय यांच्या समोर व्यक्त झाल्या होत्या निवडणूक आयोगांनी ठामपणे न्यायालयासमोर सांगितले कि पुरेशी तांत्रिक व प्रशासकीय सुरक्षितता पुरवली असल्याने व काळजी घेतल्या असल्याने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे अनधिकृतपणे फेरबदल करण्याचे कारण नाही व त्यामुळे निवडणूक प्रक्रियेची सचोटी व प्रमाणीकरण अबाधित ठेवला गेला आहे.

२००१ सालापासून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात अनधिकृतरीत्या फेरबदल केले असल्याचा विषय उच्च न्यायालयासमोर उपस्थित केल्या गेला.

A. मा. मद्रास उच्च न्यायालय २००१

B. मा. दिल्ली उच्च न्यायालय २००४

C. मा. कर्नाटक उच्च न्यायालय २००४

D. मा. केरळ उच्च न्यायालय २००२

E. मा. मुंबई उच्च न्यायालय (नागपूर खंडपीठ) २००४

याबाबत न्यायालयीन इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर करण्यामध्ये असलेल्या सर्व तांत्रिक व प्रशासकीय बाबींचा सविस्तर विचार केला व असा निर्णय दिला कि, भारतात वापरली जाणारी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे विश्वासार्ह भरवशाची व अनधिकृतपणे फेरफार करण्यापासून पूर्णपणे सुरक्षित (टोटली टेम्परप्रूप) अशी आहेत. उच्च न्यायालयीन दिलेल्या निर्णय विरोधात सर्वोच्च न्यायालयांनी याचिका फेटाळली व भारतीय निवडणूक आयोगाची विश्वासर्हता अधोरेखित सिद्ध झाले.

**निष्कर्ष**

1) भारतीय निवडणूक आयोगाच्या कर्तव्यतत्पर भूमिकामुळे लोकशाही सुदृढ झालेली असून तीचे संवर्धन करण्यात आयोगाचे मोलाचे योगदान आहे.

2) १९५२ पासून सातत्याने भारतात झालेल्या सर्व निवडणुकांचे प्रतिकूल आव्हाने स्वीकारले असून विधिमय मार्गाने प्रभावी संचालन करून सरकार स्थापण्यास आयोगाच्या भूमिकेमुळे राज्याव्यवस्थेला यश आले आहे.

3) प्रतिकूल परिस्थितीत लोकशाही पुढील आव्हाने निर्माण झालेली असताना राजकीय हस्तक्षेपाना झुगारून मोकळ्या वातावरणात निवडणुका पार पडण्याचे आव्हान समर्थपणे पेलल्याने निवडणूक आयोगाने सिद्ध केले आहे.

4) निवडणुका निर्भीळ, नि:स्पृह आणि मुक्त वातावरणात पार पाडण्यात निर्वाचन आयोगाच्या प्रशासनाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

5) एक व्यक्ती आणि एक मत व भारतातातील सर्व नागरिकांना आयोगाने एक खंबीर पूल उचलेले आहे.

**सारांश**

भारत हे सरकारच्या अक्यारीतीतील एक स्वायत्त घटन्तमक संस्था आहे. निवडणूक आयोगाला भारतीय संविधानाच्या चार स्तंभापैकी एक मानले जाते. गुप्त मतदानाच्या माध्यामातून आपला उमेदवार निवडणे हे लोकशाहीचे तत्व म्हणून विकासभीमुख ठरलेले आहे. आधुनिक कालखंडात लोकशाही प्रणालीचा मुळ गाभा हा निवडणुका आहे. भारतात लोकशाही व्यवस्था बळकट होणे आणि समाजातील सर्व स्तरातील लोकांचा राजकीय सहभाग वाढवणे तसेच राजकीय बाबी संबंधी नागरिकांमध्ये असलेली उदासीनता दूर करणे व होणाऱ्या मतदानाची टक्केवारी वाढविणे हे भारतीय लोकशाहीमुळे निवडणूक आयोगासमोर आजही आव्हानच आहे. निवडणूक आयोगाचे कार्य केवळ निवडणुका घेणे, निकाल जाहीर करणे इथपर्यंतच मर्यादित नसून त्याची व्यापकता समाजजीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी आहे.

सध्या सर्वत्र जिल्हा परिषद नगरपालिका नगरपंचायत पंचायातसमिती व महानगरपालिका व ओ.बी.सी. आरक्षण होत असताना राज्य निवडणूक आयोगानी मा. सर्वोच्चन्यायालयांच्या आदेशाचे पालन करून ओ.बी.सी. आरक्षण सोडून निवडणूक घेण्याचे धाडस राज्यनिवडणूक दाखविते आपल्या देशातील लोकशाहीला जगातील सर्वात मोठी यशस्वी लोकशाही म्हटले जाते. भारत निवडणूक आयोग संघराज्यासाठी निवडणुका घेत असते त्याचा आवाका खूप मोठा आहे याच भूमिकेतून राज्य निवडणूक आयोग स्थापन झाला याची कल्पना अनेकांना नसेल राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा शक्ती व अधिकार संदर्भात सर्वोच्च्य न्यायालयाने १९ ऑक्टोंबर २००६ रोजी किशनसिंग तोमर विरुद्ध आहमदाबाद शहर नगरपालिका बाबत महत्वपूर्ण निकाल दिला असून व याचा त्यांनी राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा स्वतंत्र आहे. राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा भारत निवडणूक आयोगाच्या मुख निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्त्यांच्या दर्जाशी संमतुल्य आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**

1. Narain, Iqbal; Pande, K.C.; Sharma, M.L. Rajpal, Hansa, 'Election Studies in India; An Evaluation', New Delhi: allied Publication, 1978.

2. Brass, Paul, 'Caste, Faction of Party in Indian Politics', Volume Two: Elect ion Studies, Delhi: Chanakya Publications, 1985.

3. Basu, Durga Das, 'Introduction to the constitution of India' Prentice Hall of India Pvt. Ltd., New Delhi, 18 Ed., April 1997.

4. आढा आर.आर. भारत में निर्वाचन व्यवस्था चुनौतीया एवं साम्भावानए, ए.बी.डी. जयपूर, प्रथमावृत्ती, २००८.

5. ऑस्टीन ग्रानिव्हील, भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशीला, अनुवाद भारती केळकर, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१३.

6. कश्यप, सुभाष (संम्पा.) इलेक्शन्स एन्ड इलेक्ट्रोल Reforms इन इंडिया, आई. सी. पी. एस. नै दिल्ली, १९७१

7. पळशीकर सुहास, राउत, व्होरा राजेंद्र, भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१०

8. कांबळे प्राचार्य डॉ. बाळ, संपादक, भारतीय लोकशाही समोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१२

9. सबनीस श्री. नि. अडव्होकेट, निवडणूक कायदा व नियम, प्रकाशक मुकुंद, ठाणे, प्रथमआवृत्ती मार्च २००४.

10.पाटील डॉ. वा. भा. भारतीय राज्यघटना भाग-२ प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती, जून २०१२.

11.https//mrwikipedia.org.